| MHKO030076492024 | संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५२४०/२०२४<br>नि.६ लगत<br>महाराष्ट्र शासन<br>वि.<br>सतिश सुरेश काळे |
|---|---|

## –: न्यायनिर्णय :–
## (घोषित दिनांक–२२/०७/२०२५)

अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती आर.आर.जोरवर व आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. एन. एस. चौगले यांचा युक्तिवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार केल्यानंतर व दोन्ही पक्षांचा सखोल युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णयीत करावयाचे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपी ही दि. २९/०२/२०२४ रोजी गोसावी गल्ली, गडमुडशिंगी, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथे एका पत्र्याच्या शेडमध्ये आपले कब्जात एका प्लास्टीक कॅनमध्ये १७ लिटर गावटी हातभट्टीची दारु व पाच काचेचे ग्लास असा मुद्देमाल गावठी हातभट्टीची दारु विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे जवळ बाळगताना मिळून आल्याचे व त्यायोगे महाराष्ट्र मद्य निषेध अ.१९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | ..नाही |
| २. | कोणता आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## – कारणमिमांसा –

**मुद्दा क्रमांक १ करिता:–**

२. आरोपीविरुद्ध लावण्यात आलेला गुन्हा सिद्ध करण्यासाठी

अभियोगपक्षाने पंच साक्षीदार क्र.१ रविंद्र राजहंस सोनवणे (अ.सा.क्र.१) यांची साक्ष नोंदवली आहे. तद्नंतर निशाणी ८ कडे पुरसीस दाखल करुन अभियोगपक्षाने आपला पुरावा बंद केला आहे. आरोपीविरुध्द सबळ पुरावा न आल्याने फौ.प्र.सं.कलम ३१३(१)(ब) अन्वये आरोपीचे निवेदन नोंदविलेले नाही.

**३.** अभियोग पक्षाने पंच साक्षीदार रविंद्र (अ.सा.क्र.१) यांना तपासले त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक २९/०२/२०२४ रोजी पोलीसांनी त्यांना बोलावले होते. त्यावेळी पोलीसांनी कोऱ्या कागदावर सह्या घेतल्या. त्यांना घटनास्थळ व मुद्देमाल जप्ती पंचनामा दाखविला असता, त्यावरील अ.क्र.१ वरील सही त्यांनी ओळखली परंतु, त्यातील मजकूर माहित नसल्याचे सांगितले. प्रस्तुतचा पंच साक्षीदार हा अभियोग पक्षास सहाय्यक पुरावा देत नसलेने अभियोग पक्षाने भारतीय पुरावा कायदा, १८७२ चे कलम १५४ प्रमाणे त्यांचा उलटतपास घेण्यास परवानगी घेवून त्यांचा उलटतपास घेतला असता त्यामध्ये त्यांनी दिनांक २९/०२/२०२४ रोजी पोलीसांनी त्याला पंचनाम्यासाठी गडमुडशिंगी ता. करवीर, जि. कोल्हापूर येथे बोलावले होते हे स्पष्टपणे नाकारले आहे. तसेच घटनास्थळी आरोपीच्या ताब्यातून एका प्लास्टीक कॅनमध्ये १७ लिटर गावठी हातभट्टीची दारु व पाच काचेचे ग्लास त्यांचे समक्ष जप्त करुन जप्ती पंचनामा केल्याचे नाकारले आहे. तसेच त्यांनी जप्ती पंचनामा वाचून त्यावर सही केल्याचे नाकारले आहे.

**४.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या एकमेव साक्षीदाराच्या कथनाचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, रविंद्र (अ.सा.क्र.१) हा पंच साक्षीदार असून तो अभियोग पक्षास कोणतेही सहकार्य करीत नसल्याने त्यांचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही. अभियोग पक्षातर्फे घटनास्थळावरील कोणताही प्रत्यक्षदर्शी त्रयस्त साक्षीदार तसेच फिर्यादी यांना तपासल्याचे दिसून येत नाही. अभियोग पक्षातर्फे मुद्देमाल जप्ती पंचनामा शाबित करण्यात आलेला नाही.

आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या दारुमधील सॅम्पल काढून घेणेत आले होते व परंतू त्याबाबतचा रासायनिक विश्लेषकाचा अहवाल प्रकरणात दाखल असल्याचे दिसून येत नाही.

५. आरोपीकडून जप्त मुद्देमालाचे नमुने प्रयोगशाळेत पाठविले होते ही बाब शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने नमुना घेवून गेलेल्या व्यक्तीची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे सदर नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविले होते याबाबत संशय निर्माण होतो. त्यामुळे आरोपीकडून जप्त केलेला मुद्देमाल ही दारुच होती हे शाबीत होत नाही.

६. अशा परिस्थितीत आरोपी याने विनापरवाना, बेकायदेशीरपणे सार्वजनिक ठिकाणी गावठी हातभट्टीची दारु विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगल्याचे तसेच ती आरोपीकडून जप्त करण्यात आल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केलेले नाही. त्यामुळे आरोपी हा सार्वजनिक ठिकाणी गावठी हातभट्टीची दारु विक्री करत असताना मिळून आल्याचे अभियोग पक्ष ठोस पुराव्यानिशी शाबीत करु शकलेला नाही. त्यामुळे सदर आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

## <u>मुद्दा क्रमांक २ करिता–</u>

७. मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला असल्याने आरोपी निर्दोष होण्यास पात्र आहे. प्रस्तुत कामी पिडीत अगर नुकसानग्रस्त कोणीही नसलेने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३५७–अ प्रमाणे नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता नाही. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एका प्लास्टीक कॅनमधील १७ लिटर गावठी हातभट्टीची दारु ही अपील कालीवधीनंतर योग्य त्या निर्गती करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर येथे पाठवणे न्यायोचीत होईल. तसेच जप्त मुद्देमाल पाच काचेचे ग्लास हे आजरोजी निरुपयोगी व मुल्यहीन असल्याने

नाश करणे योग्य होणार आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

## – आदेश –

**१.** आरोपी **सतिश सुरेश काळे** याची महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियमचे १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयामधून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २६० अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचे बंधपत्र व जामीनदाराचा जामीन खतबा रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) प्रमाणे मा. अपिल न्यायालयासमोर उपस्थीत होण्यासाठी रक्कम रुपये १५,०००/– वैयक्तीक जातमुचलका लिहून द्यावा.

**४.** प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एका प्लास्टीक कॅनमधील १७ लिटर गावठी हातभट्टीची दारु ही अपील कालीवधीनंतर योग्य त्या निर्गती करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर येथे पाठवण्यात यावी. तसेच जप्त मुद्देमाल पाच काचेचे ग्लास हे आज रोजी मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावेत.

**५.** मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रंजना शांतिलाल सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश तुळशीराम गुप्ता क्रिमी.अपिल (एस.टी.) नंबर ३९०/२०१९ या न्यायनिवाडयात निर्देशित केलेप्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत यावी.

(**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.**)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ARCHANA SUBHASH PANSARE
Date: 2025.07.23 17:53:25 +0530

कोल्हापूर.
दिनांक. २२/०७/२०२५

अर्चना एस. पानसरे
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.५
कोल्हापूर